# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि —४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५(महा.) फोन:०७१३२.२१६५५४,२२३१०४,२१६५९४फॅक्स रू ०७१३२,२२३३२२

**Email : arcollegesectiongug48@gmail.com web:gondwana.digitaluniversity.ac web:gondwanauniversity.org**

(डॉ. एस. एम. रोकडे)
संचालक (प्रभारी)

क्रमांक/महा.वि/गो.वि./6051 /२०१६
दिनांक : 19/ ०३/२०१६

प्रति,

मा. प्राचार्य/अध्यक्ष/सचिव,

सर्व संलग्नित महाविद्यालये

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:— २२ मार्च या जागतीक जलदिनानिमित्त जलजागृती सप्ताह साजरा करणेबाबत

सदंर्भ:—१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण—१११९/(प्र.क्र.२५/२०१६/समन्वय), दि. १५.३.२०१६

२) शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्र संकीर्ण—२०१६/(प्र.क्र.७/१६/लाक्षेवि (आस्था), दि. ११.०२. २०१६

महोदय,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ नुसार दि. १६ मार्च ते २२ मार्च, या कालावधीत संपुर्ण राज्यात प्रथमच "जलजागृती सप्ताह" साजरा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने शिक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये वकृत्व स्पर्धा, व्याख्याने, जलसाहित्य संम्मेलन, प्रदर्शन, जलसंपदा प्रकल्पांना, जलशुध्दीकरण प्रकल्पास भेटी देणे असे उपक्रम राबविण्यात यावे.

संलग्नित:— वरिलप्रमाणे

सहायक कुलसचिव
महाविद्यालयीन विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
आवक क्र. 2419 दिनांक 16/03/16
जावक क्र. 1208 दिनांक 17/3/16

२२ मार्च या जागतिक जलदिनानिमित्त
जल जागृती सप्ताह साजरा करणेबाबत.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 30 दिनांक 17-3-16
जावक क्र. दिनांक

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-१११९/(प्र.क्र.२५/२०१६)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १५ मार्च, २०१६.

**वाचा** :- शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्र.संकीर्ण-२०१६/(प्र.क्र.७/१६)/लाक्षेवि (आस्था) दि.११.२.२०१६

**शासन परिपत्रक :-**

राज्यात गेल्या काही वर्षात नैसर्गिक बदलामुळे पावसाचे प्रमाण व वेळा अनिश्चित झाल्याने पाण्याची उपलब्धता कमी होत आहे. त्यामुळे सतत अवर्षणाच्या परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थिमीमध्ये उपलब्ध पाण्याचा अतिशय काळजीपूर्वक व काटकसरीने सुनियोजित वापर करुन ते वर्षभर पुरवणे एवढेच आपल्याहाती असून चालू वर्षी राज्यात अभूतपूर्व पाणीटंचाई परिस्थिती आहे. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी राज्यातील जनतेमध्ये पाण्याबददल जागृती निर्माण करण्याची आवश्यकता आहे. या उद्देशाने प्रतिवर्षी दि.१६ मार्च ते २२ मार्च, या कालावधीत संपूर्ण राज्यात प्रथमच " जलजागृती सप्ताह " साजरा करण्याबाबत दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ च्या मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला असून त्यानुषंगाने शासनाच्या वतीने जलसंपदा विभागामार्फत दि.११.२.२०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

२. जलजागृती सप्ताहामध्ये राज्यस्तरावर, विभागस्तरावर, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयांमध्ये जलजागृती उपक्रम राबविण्याबाबत वरील शासन निर्णयान्वये सूचना दिलेल्या आहेत. त्यानुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत राबविण्याच्या कार्यक्रमाबाबत या विभागाच्या अखत्यारीतील सर्व संचालनालयांना व राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांना पुढील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

" शिक्षणाच्या माध्यमातून भावी पिढी निर्माण होत असल्याने जलसप्ताहाच्या कार्यक्रमाच्या आयोजनातून सर्व स्तरातील विद्यार्थ्यामध्ये पाण्याचे महत्व, पाण्याचे संवर्धनृ प्रदुषण, पाण्याची गुणवत्ता या विषयी जागृती निर्माण होणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने महाविद्यालयामध्ये वकृत्व स्पर्धा, व्याख्याने, जलसाहित्य संम्मेलन, प्रदर्शन, जलसंपदा प्रकल्पांना, जलशुध्दीकरण प्रकल्पास भेटी देणे असे उपक्रम जलजागृती सप्ताह साजरा करण्याच्या निमित्याने राबविण्यात यावेत."

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१६०३१५१५१८५४८६०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay G Chandekar

Digitally signed by Vijay G Chandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vijay G Chandekar
Date: 2016.03.15 15:21:50 +05'30'

(वि.गो.चांदेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री (जलसंपदा, खार भूमी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व सह सचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
७. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना कळवावे.
९. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना कळवावे.
१०. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना कळवावे.
११. संचालक, ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना कळवावे.
१२. निवडनस्ती (समन्वय)